पुढारी
शुक्रवार, २५ नोव्हेंबर २०२२

# राजगुरू महाविद्यालयात वेटलिफ्टिंग स्पर्धा उत्साहात

राजगुरुनगर : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने मुलींच्या आंतरविभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि. २०) करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. दीपक माने, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सहसचिव प्रा. आशिष तळेकर, संस्था संचालक बाळासाहेब सांडभोर, अरविंद दौंडकर, निवड समिती सदस्य प्रा. विजय देशमुख, राजेंद्र सोनवणे, प्रवीण व्यवहारे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, पंच म्हणून पुणे जिल्हा वेटलिफ्टिंग संघटनेचे उपाध्यक्ष शरद काळे, राष्ट्रीय खेळाडू सविता फलके, प्रा. शिवाजी भिताडे, प्रा. रोहित तांबे, प्रा. बी. एस. पाटील, प्रा. विवेक साळवे, प्रा. स्वप्नील कर्पे, प्रा. एल. कांडेकर आदी उपस्थित होते. या स्पर्धेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या पुणे शहर, पुणे जिल्हा, अहमदनगर आणि नाशिक अशा चारही विभागातून आलेल्या वेटलिफ्टिंग खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेमध्ये साक्षी मस्के या खेळाडूची बेस्ट वेटलिफ्टर म्हणून निवड झाली. या स्पर्धेतून निवडला जाणारा संघ हा जानेवारी २०२३ मध्ये होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले, तर आभार प्रा. लोणारी यांनी मानले.